### राज्यस्तरीय संगीतनृत्य स्पर्धेत

# सायली रत्नपारखी वैयक्तिक नृत्य गटात प्रथम

नाशिक (प्रतिनिधी)- लातूर येथे अष्टविनायक प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय संगीत नृत्य स्पर्धेत नाशिकच्या कु. सायली रत्नपारखीने बहारदार कथ्थक नृत्य सादर करून वैयक्तिक नृत्य गटात प्रथम क्रमांक पटकावला.



लातूर येथे दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन केले जाते. यंदा या राज्यस्तरीय स्पर्धांचे हे पंधरावे वर्ष असून, भक्ति गीत, शास्त्रीय संगीत, समूहगीत, वैयक्तिक नृत्य, सामूहिक नृत्य आणि सिनेशास्त्रीय गायन अशा सहा गटांमध्ये या स्पर्धा घेण्यात आल्या. वैयक्तिक नृत्य गटात (प्रौढ गट) नाशिकची कु. सायलीने कथ्थक नृत्य सादर केले. यावेळी पुणे येथील प्रसिद्ध नृत्यांगना सौ. स्वाती देठकर यांच्या हस्ते सायलीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. अडीच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सायलीची शिष्या कु. प्रजना प्राणेश हिने शिशु गटात 'कांटा लगा' या गीतावर नृत्य सादर केले. यावेळी प्रजना हिचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. नाशिक येथे जेसीज सप्ताहनिमित्त आयोजित नृत्य स्पर्धांमध्येही यापूर्वी सायलीने यश मिळविले आहे. ती कथ्थक नृत्याच्या उपांत्य विषयात सहा परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.